निवेदन

आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे.
करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८

साप्ताहिक

संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : ११ वा ■ सोमवार दि.५ ऑक्टोंबर ते ११ ऑक्टोंबर २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने – ०४

महाराष्ट्रात प्रत्येक गैरकारभारासाठी... पान २ वर | पुण्यातील पत्रकार हल्ल्याप्रकरणी... पान ३ वर | एसआयआर : हरकतींसाठी १२.. पान ४ वर

हिटलरची पद्धत RSS ने उचलली; सरकारला फुले, आंबेडकर वाद्यांची ताकद बघायची आहे का? - ॲड. प्रकाश आंबेडकरांचा थेट इशारा!

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांच्या पुस्तकावर बंदी प्रकरण:

पुणे : फुले-शाहू-आंबेडकरी विचार, साहित्य आणि शिक्षणाला मनुवादाच्या विरोधातील असल्याच्या कारणावरून बाजूला करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. 'हिटलरने ज्यांना बॅन करायचे होते, त्यांना अँटी-जर्मन ठरवून बंदी घातली. त्याच पद्धतीची विचारसरणी RSSने उचलली आहे, असे ते म्हणाले. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या विचारांना मनुवादी व्यवस्थेच्या विरोधातील ठरवून त्यांची समीक्षा करून ते अभ्यासक्रमातून वगळण्याची भूमिका पंतप्रधान कार्यालयाने जाहीर केलेल्या एका पत्रकातून समोर आले आहे. याचा संदर्भ देत ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केंद्र सरकारवर टीका केली. सोशल मीडियावर करण्यात आलेल्या एका पोस्टची दखल घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याबाबत तपास करून मनुवादाच्या विरोधातील साहित्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे सांगितले.

ॲड. आंबेडकर म्हणाले की, विद्यापीठांमध्ये शाहू, फुले, आंबेडकर शिकवले जातात. आता त्यांना हद्दपार करण्याचा मार्ग अवलंबला जात आहे. ही प्रक्रिया थांबवण्याची सुरुवात झाली पाहिजे, असे ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले. १९७८ ते ७९ च्या काळात असाच प्रयत्न महाराष्ट्रात 'रिडल्स इन हिंदुइझम' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित पुस्तकावरून बाळ ठाकरे यांनी वाद निर्माण केला होता. त्याविरोधात लाखो फुले-शाहू-आंबेडकरी जनता रस्त्यावर उतरली होती. आणि सरकारला निर्णय मागे घ्यायला भाग पाडले होते. ती फुले,शाहू, आंबेडकरवाद्यांची देशभरातील ताकद आरएसएस-भाजपला बघायची आहे का? असा इशारा ही त्यांनी दिला.

हिटलरच्या काळात जर्मनीविरोधी असल्याचे कारण देऊन अनेक पुस्तकांवर बंदी घातली गेली होती. तसेच आरएसएस भाजप करत आहे. त्यांना 'हिटलरची कॉपी करायची आहे. आरएसएस हे काही ओरिजनल थिंकर्स नाहीत'. मनुवाद हा सामाजिक दृष्टिकोनातून लोकांना 'कैद' करण्याची व्यवस्था आहे. महिला, शूद्र आणि अतिशूद्र यांच्यावर या व्यवस्थेचा परिणाम झाला. आता कोणीही कोणाचा गुलाम व्हायला तयार नाही. लोकांना स्वातंत्र्याने जगायचे आहे, असेही ते म्हणाले.

लोक रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत -

सरकारने आपली भूमिका मागे घेतली नाही तर लोक रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत, स्वातंत्र्य वाचवण्यासाठी जी काही किंमत द्यावी लागेल, ती आम्ही निश्चितपणे देऊ, असेही त्यांनी सांगितले.

मोहन भागवत (पान २ वर)

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता श्री.भरतकुमार बाविस्कर यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्याकडून चौकशी होणार का?

वाचा पुढील अंकात..

पोलिस अधिकारी बदलीवर गेला... पण माणूस मात्र मनामनात कायमचा राहिला!





पुणे : कर्तव्यदक्षता, कडक शिस्त, धडाडी आणि माणुसकीचा सुंदर संगम जपणारा अधिकारी म्हणून अवघ्या साडेनऊ महिन्यांच्या कार्यकाळात नागरिकांच्या तसेच सहकाऱ्यांच्या मनात वेगळे स्थान निर्माण करणारे लक्ष्मी नगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांची पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय येथे बदली झाली. त्यांच्या निरोप समारंभात मात्र पदावरून जाणाऱ्या अधिकाऱ्यापेक्षा एक आपला माणूस दूर जात असल्याची भावना प्रकर्षाने जाणवत होती. अनेक भावुक क्षणांनी वातावरण अक्षरशः भारावून गेले होते.

बदली ही सेवेतील एक प्रक्रिया आहे; मात्र जिंकलेली मने आणि निर्माण केलेल्या आठवणींची कधीच बदली होत नाही, अशा भावनिक भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या. येरवड्यातील लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नाट्य कला रंगमंदिरात आयोजित करण्यात आलेल्या निरोप समारंभात विद्यमान आमदार बापूसाहेब पठारे, माजी आमदार जगदीश मुळीक, (पान ३ वर)

पदभार स्विकारताच संजिव चोपडे यांचे पाण्याचे संवर्धन, योग्य नियोजन आणि कार्यक्षम वापराबाबत आवाहन



पुणे : पाण्याचे संवर्धन, योग्य नियोजन आणि कार्यक्षम वापर यासाठी सरकार आणि समाज यांच्यातील सहभाग अधिक दृढ करणे, ही काळाजी गरज आहे. त्यासाठी पाण्याबाबत समाजामध्ये दीर्घकालीन जाणीव आणि जबाबदारी निर्माण करण्याठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जलसेवा संकल्प अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संजीव चोपडे यांनी केले. नुकतेच कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकपदी संजीव चोपडे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी या पदाचा कारभार स्वीकारला. डॉ.हनुमंत धुमाळ यांच्या निवृत्तीनंतर त्यांची नियुक्ती झाली आहे. चोपडे यापूर्वी महामंडळातच मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) या पदावर कार्यरत होते. विविध महत्वाच्या पदांवर काम करण्याचा अनुभव त्यांच्या गाठीशी असून, जलसंपदा विभागातील त्यांच्या प्रदीर्घ प्रशासकीय व तांत्रिक अनुभवाचा महामंडळाच्या कामकाजासाठी उपयोग होणार आहे. चोपडे यांनी यापुर्वी मुख्य अभियंता, जलविद्युत विभाग तसेच अधीक्षक अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग यांसारख्या महत्वाच्या पदांवर काम केले आहे. या पदांवर कार्यरत असताना त्यांना सिंचन व्यवस्था, जलसंपत्तीचे नियोजन आणि विविध जलसंपदा प्रकल्पांच्या कामकाजाचा अनुभव असल्याने कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अंतर्गत जनहिताची मोठ्या प्रमाणात कामे होताना दिसतील यामध्ये शंका नाही. त्यांनी पदभार स्विकारल्याबरोबरच जलसंपदा विभागाने २ ते १७ ऑक्टोबर या कालावधीत जलसेवा संकल्प अभियान राबविण्याचे ठरविले आहे. (पान ३ वर)

संपादकीय...

महाराष्ट्रात प्रत्येक गैरकारभारासाठी तुकाराम मुंढेच का हवेत?

महाराष्ट्रात एखाद्या सरकारी विभागात गैरकारभार झाला, नियमांची पायमल्ली झाली, भ्रष्टाचाराच्या तक्रारी वाढल्या किंवा अधिकारी-कर्मचारी कामचुकारपणा करत असल्याच्या बातम्या समोर आल्या की नागरिकांच्या चर्चेत एक नाव हमखास ऐकायला मिळते. इथे तुकाराम मुंढे यांच्यासारखा अधिकारी हवा. ही मागणी केवळ एका अधिकाऱ्याच्या लोकप्रियतेचे प्रतीक नाही. उलट ती महाराष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेबाबत नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या अस्वस्थतेचे लक्षण आहे. प्रश्न असा आहे की, गैरकारभार थांबवण्यासाठी नागरिकांना वारंवार फक्त तुकाराम मुंढे यांचेच नाव का आठवते? महाराष्ट्रात इतर सनदी अधिकारी काय करतात?

तुकाराम मुंढे यांच्या कार्यशैलीची सर्वात मोठी ओळख म्हणजे नियमांची कठोर अंमलबजावणी, प्रत्यक्ष पाहणी आणि निर्णय घेण्याची तयारी. सध्या अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून त्यांनी भेसळ, अन्नसुरक्षा, औषध आणि परवाना नियमांच्या अंमलबजावणीवर मोठ्या प्रमाणात भर दिल्याचे अलीकडील वृत्तांतून दिसते. त्यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणावर तपासण्या आणि परवाना निलंबनाची कारवाई झाल्याचेही वृत्त आहे. त्यामुळेच सर्वसामान्य नागरिकांच्या मनात एक प्रतिमा तयार झाली आहे-नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करणारा अधिकारी. त्यांच्या कार्यशैलीवर टीका किंवा वाद असू शकतात; परंतु नागरिकांना त्यांच्यात सर्वात महत्त्वाचे काय दिसते, तर ते म्हणजे प्रशासनाने प्रत्यक्ष काम करावे ही अपेक्षा. परंतु येथेच खरी चिंता सुरू होते. महाराष्ट्रात हजारो वरिष्ठ अधिकारी, शेकडो आयएएस अधिकारी आणि प्रचंड प्रशासकीय यंत्रणा कार्यरत आहे. प्रत्येक विभागासाठी सचिव, आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक आणि इतर वरिष्ठ अधिकारी असतात. मग एखाद्या विभागात गैरप्रकार झाला की नागरिकांनी मुंढे यांना आणा असे म्हणणे ही त्या अधिकाऱ्याचीच मोठी प्रशंसा आहे की संपूर्ण व्यवस्थेवरील अविश्वासाचे चिन्ह आहे?

आज रस्ते खराब असतील, नाले तुंबले असतील, सरकारी रुग्णालयात गैरव्यवस्था असेल, अन्नभेसळ होत असेल, औषधांची विक्री नियमबाह्य पद्धतीने होत असेल, बांधकाम नियमांची पायमल्ली होत असेल किंवा सरकारी निधीच्या वापराबाबत प्रश्न निर्माण होत असतील-प्रत्येक ठिकाणी नागरिकांना एका कडक अधिकाऱ्याची गरज भासू नये. ज्या अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात समस्या निर्माण झाली आहे, त्यानेच त्यावर कारवाई करणे ही सामान्य आणि अपेक्षित बाब असली पाहिजे. मग बाकी आयएएस अधिकारी करतात काय? हा प्रश्न योग्य पद्धतीने विचारला पाहिजे. याचा अर्थ असा नाही की महाराष्ट्रातील इतर सर्व आयएएस अधिकारी निष्क्रिय आहेत. अनेक अधिकारी प्रशासनात महत्त्वाचे काम करतात, धोरणांची अंमलबजावणी करतात, विकासकामे राबवतात आणि नागरिकांच्या समस्या सोडवतात. परंतु त्यांच्या कामाची माहिती नागरिकांपर्यंत किती पोहोचते, कारवाई किती दृश्यमान असते आणि प्रशासनातील उत्तरदायित्व किती स्पष्ट असते, हा प्रश्न आहे?

तुकाराम मुंढे यांच्या बाबतीत माध्यमांचे आणि जनतेचे लक्ष त्यांच्या कार्यशैलीकडे सातत्याने राहिले आहे. त्यांच्या कारकिर्दीत अनेकदा बदल्या झाल्याचे वृत्तांत प्रसिद्ध झाले आहेत आणि त्यांच्या कार्यपद्धतीभोवती सातत्याने सार्वजनिक चर्चा होत आली आहे. तुकाराम मुंढे यांची मागणी वाढत असेल तर त्याकडे केवळ एका अधिकाऱ्याची लोकप्रियता म्हणून पाहू नये. ती प्रशासनाला दिलेली नागरिकांची एक स्पष्ट सूचना आहे-आम्हाला अधिकारी फक्त पदावर बसलेला नको; अधिकारी काम करताना दिसला पाहिजे. नियम फक्त कागदावर नकोत; त्यांची अंमलबजावणी प्रत्यक्षात झाली पाहिजे. आणि गैरकारभार करणाऱ्याला त्याच्या पदाची नव्हे, तर कायद्याची भीती वाटली पाहिजे.

ही अपेक्षा फक्त तुकाराम मुंढे यांच्याकडून नाही, तर महाराष्ट्रातील प्रत्येक जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्याकडून असली पाहिजे.


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक – यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग – सी – २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे – ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात
Email : sangharshachaaawaz22@gmail.com
Email : sangharshachaaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



मागील अंकावरून

दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास कारणीभूत ठरतात.

ज्याचे मित्र व सहयोगी, सोबती जर पापानी बरबटले असतील तर तो दोन्ही जगात नष्ट-भ्रष्ट होईल. या लोकात व परलोकात देखील जुगार, परनारीगमन, दारू, नाच, गाणे, दिवसभर झोप. अनेक गल्ली बोळांत फिरणे, वाईटाची संगत, परकोटीचा लोभ अशा एकूण नऊ कारणांनी मनुष्य बरबाद होतो. नेस्तनाबूत होतो.

जो जुगार खेळतो, जो नशापाणी करतो, परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवतो. जो नीच लोकांची संगत करतो, ज्ञानी लोकांची संगत करित नाही, त्यांचा सहवास टाळतो त्याची अधोगती होते. जशी कृष्ण पक्षातील चंद्राची कला. **क्रमश:**

सिगोलवाद सुत्त

मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.

जयभीम!

उत्तमराव सोनवणे

'जस्मिन शाह' यांनी लिहिलेले, 'केजरीवाल मॉडेल' या पुस्तकाच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन झाले



पुणे : आम आदमी पार्टी (आप) चे धोरणतज्ञ 'जस्मिन शाह' यांनी लिहिलेले, 'केजरीवाल मॉडेल' या पुस्तकाच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन नुकतेच पुण्यात भारत इतिहास संशोधन मंडळ येथे झाले. मूळ इंग्रजीत 'द दिल्ली मॉडेल: अ बोल्ड न्यू रोड मॅप टू बिल्डिंग अ डेव्हलप्ड इंडिया' या नावाने प्रकाशित या पुस्तकात दिल्लीतील आप सरकारने राबवलेल्या शासन आणि धोरणात्मक सुधारणांचे परीक्षण आणि संशोधनावर आधारित लिखाण आहे.

यावेळी स्वतः लेखक जस्मिन शाह, माजी प्रशासकीय अधिकारी महेश झगडे, सकाळचे संपादक सम्राट फडणीस, आपचे प्रभारी व माजी आमदार प्रकाश जारवाल, उपाध्यक्ष विजय कुंभार व मधुश्री पब्लिकेशनचे शरद अष्टेकर हे प्रकाशनानंतरच्या चर्चासत्रात सामील झाले होते.

दिल्लीतील आप सरकारचे आणि आताचे पंजाब मधील केजरीवाल मॉडेल हे केवळ पायाभूत सुविधांवर आधारित पारंपरिक मॉडेलऐवजी, मानवी भांडवल विकासावर केंद्रित असलेल्या जनता-केंद्रित विकासाचे मॉडेल असून या पुस्तकात सहा प्रमुख क्षेत्रे: शिक्षण, आरोग्यसेवा (जसे की मोहल्ला क्लिनिक्स), सार्वजनिक वाहतूक, वीज, पाणी आणि वायू प्रदूषण या क्षेत्रांमधील धोरणांची रचना, अंमलबजावणी आणि परिणामांचे विश्लेषण केले आहे. या पुस्तकात दिल्लीतील आपच्या मॉडेलच्या आर्थिक पायाचे विश्लेषण आणि गुजरात मॉडेलसारख्या इतर प्रारूपांशी त्याची तुलना केलेली आहे. असे जस्मिन शहा यांनी सांगितले.

माजी आमदार प्रकाश जारवाल यांनी याबाबत दिल्लीतील पाणी पुरवठ्याचा अनुभव सांगत सार्वजनिक कल्याणकारी आणि भ्रष्टाचारविरोधी धोरणांना हा एक दूरदृष्टीचा आराखडा असल्याचे नमूद केले.

भारतातील विकासाच्या अधोगतीला राजकारणी आणि नोकरशहा कारणीभूत असल्याचे नमूद करत मॉडेल डिझाईन करणे सोपे असते परंतु त्याची अंमलबजावणी करणे हे अत्यंत कठीण असते आणि दिल्लीमध्ये अपयशी माजी नोकरशहाचा सल्लागार म्हणून वापर न करता यातील विविध तज्ञांच्या सहाय्याने हे मॉडेल बनवले गेले हे पण एक वेगळे वैशिष्ट्य असल्याचे नमूद केले.

यावेळी सम्राट फडणीस यांनी महाराष्ट्राच्या आणि प्रामुख्याने पुण्यासारख्या ठिकाणी चालू असलेल्या एक लाख कोटींच्या विविध प्रकल्पांच्या प्राथमिकतेविषयीच शंका व्यक्त करीत येथील सार्वजनिक वाहतूक तसेच महाराष्ट्रातील सरकारी शाळांची अवस्था, दवाखान्यांची अवस्था दयनीय असून आता आयुक्त,वरिष्ठ सरकारी अधिकारी जमिनीवर उतरत नाहीत असे सखेद नमूद केले. विजय कुंभार यांनी पन्नास वर्षांपूर्वीची आपली शाळा अजूनही तशीच असल्याचे सांगत यासाठी निधीच उपलब्ध केला जात नाही अशी टिप्पणी केली.

अभिजीत मोरे यांनी सूत्र संचालन केले. यावेळेस आम आदमी पार्टीचे मुकुंद किर्दत, भूषण ढाकुलकर, मनीष मोडक, संदीप देसाई, सुनीता काळे, अमित म्हस्के, रविराज काळे, संजय कोणे, वसंतराव डोके, सुदर्शन जगदाळे, धनंजय बेनकर, सुजित आगरवाल आदी उपस्थित होते.

हिटलरची पद्धत RSS ने उचलली; सरकारला फुले, आंबेडकर...

(पान १ वरून) यांच्या अल्पसंख्याकांबाबतच्या वक्तव्याचाही संदर्भ दिला. एका बाजूला कैद करण्याचे चालले आहे आणि दुसऱ्या बाजूला अल्पसंख्याकांना कैद करण्याची भाषा नाही, अशी भूमिका भागवत कडून मांडली जाते. या दुहेरी भाषेपासून लोकांनी सावध राहावे. हिटलरशाही कोणाला घाबरते तर जनशक्तीला घाबरते. जनशक्ती रस्त्यावर उतरते आणि म्हणून त्यांचे धाबे दणाणले आहेत.

भाजप घाबरलेला असल्याचे दिसत असले तरी त्याला योग्य स्वरूप आणि आकार देणारी विरोधकांची एकजूट अद्याप दिसत नसल्याचेही त्यांनी म्हटले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने ठाम भूमिका घ्यायला हवी, असे ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले.

फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचा हा जो जनसमूह, जेन झी आहे, त्याने आता हे सगळे ताब्यात घेतले पाहिजे आणि नेतृत्व केले पाहिजे. तोच तडजोड न करता उभा राहू शकतो, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी केंद्र सरकारने संबंधित निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी करत हा निर्णय मागे न घेतल्यास संघर्ष करण्याची तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यातील पत्रकार हल्ल्याप्रकरणी आरोपीला १६ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी; ॲड.प्रकाश आंबेडकरांच्या सूचनेनंतर कलम दाखल

पुणे : 'जय महाराष्ट्र' न्यूज चॅनेलचे पत्रकार निखिल सुक्रे यांच्यावर १ ऑक्टोबर रोजी झालेल्या हल्ल्याची वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दखल घेतली आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी संबंधित प्रकरणाची माहिती घेत पोलिसांशी फोनवरून संपर्क साधल्यानंतर आरोपीविरोधात पत्रकार संरक्षण कायदा २०१९ मधील कलम ४ अंतर्गत अतिरिक्त कलमाची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणातील आरोपीला पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

१ ऑक्टोबर रोजी पुण्यात एमपीएससी परीक्षार्थींच्या आंदोलनादरम्यान वार्तांकन करत



असताना निखिल सुक्रे यांच्यावर एका विद्यार्थ्याने शिवीगाळ करून मारहाण केली होती. या घटनेनंतर सुक्रे यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल करून पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदविण्याची मागणी केली होती.

या प्रकरणात २ ऑक्टोबर रोजी विश्रामबाग पोलीस ठाण्यात CR क्रमांक ४१२ अंतर्गत भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), २९६, ३५२ आणि ३५१(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर आरोपीला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी वर्ग-१ यांच्या न्यायालयाने आरोपीला सुरुवातीला एक दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली.

दरम्यान, पुणे शहरातील पत्रकारांनी ॲड.प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी झोन-१ चे पोलीस उपायुक्त ऋषिकेश रावले यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. पत्रकारांवर अशा प्रकारचे हल्ले होणे योग्य नसून, पत्रकार संरक्षण कायदा २०१९ मधील कलम ४ या प्रकरणात लागू करण्याची सूचना त्यांनी पोलिसांना केली.

यानंतर DCP ऋषिकेश रावले यांच्या मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगताप आणि संबंधित ACP देशमाने यांच्या कार्यवाहीत पत्रकार संरक्षण कायदा २०१९ मधील कलम ४ अतिरिक्त कलम म्हणून गुन्ह्यात समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे या प्रकरणाचा तपास ACP स्तरावर वर्ग करण्यात आला आहे.

आज आरोपीला पुन्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपीला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली असून, १६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत कोठडीत राहणार आहे.

दरम्यान, पत्रकार निखिल सुक्रे यांनी या घटनेबाबत सांगितले की, एमपीएससी आंदोलनाचे वार्तांकन करण्यासाठी ते उपस्थित होते. त्यावेळी एका विद्यार्थ्याने शिवीगाळ करून त्यांच्यावर हल्ला केला. या प्रकरणी त्यांनी पोलिसांत तक्रार दिली होती आणि पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदविण्याची विनंती केली होती. सुरुवातीला त्या कायद्याचे कलम गुन्ह्यात समाविष्ट करण्यात आले नव्हते. मात्र, आता पत्रकार संरक्षण कायद्याचे कलम ४ या प्रकरणात जोडण्यात आले आहे.

पदभार स्विकारताच संजिव चोपडे यांचे पाण्याचे संवर्धन,...

(पान १ वरून) या अभियानाचा प्रारंभ शुक्रवारी (दि.२) चोपडे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प प्रवीण कोल्हे, अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, संतोष सांगळे तसेच कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि इतर अधिकारी नागरिक, शेतकरी, पाणी वापर संस्था, महिला, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, कृषी विज्ञान केंद्रे आणि जलतज्ज्ञांचा सहभाग घेऊन पाण्याचे संवर्धन, जलसाक्षरता आणि कार्यक्षम जलवापराची जाणीव अधिक व्यापक करण्यासाठी योगदान देण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

जलसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन, उपलब्ध पाण्याचा काटेकोर व कार्यक्षम वापर, जलसाक्षरता वाढविणे आणि जलव्यवस्थापनामध्ये नागरिक, शेतकरी, पाणी वापर संस्था तसेच विविध सामाजिक संस्थांचा सहभाग वाढविणे ही या अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. अभियानाच्या माध्यमातून जलसंपदा प्रकल्पांच्या लाभार्थ्यांशी आणि पाणी वापर संस्थांशी संवाद वाढविणे, शेतकऱ्यांमध्ये उपलब्ध पाण्यानुसार पीक नियोजन व पाणी बचतीबाबत जागरूकता निर्माण करणे, पुनर्वसित नागरिकांशी संवाद साधणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये जलसाक्षरता वाढविणे यावर भर देण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार कृषी विज्ञान केंद्रे, स्वयंसेवी संस्था, जलतज्ज्ञ आणि संबंधित संस्थांचा सहभाग घेण्यात येणार आहे. असे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संजीव चोपडे यांनी सांगितले.

पोलिस अधिकारी बदलीवर गेला... पण माणूस...

(पान १ वरून) सुनील टिंगरे, नगरसेवक अविनाश साळवे, विशाल मलके, नगरसेविका अश्विनी लांडगे, सामाजिक कार्यकर्ते डॅनियल लांडगे, अभिजित वाघचौरे, कोमल वाघचौरे, दीपक शिंदे, विल्सन चंदेवळ, ज्योती चंदेवळ, मिलिंद गायकवाड, सुदीप गायकवाड, विवेक देव, सदानंद काळे, येरवडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक उमेश गित्ते यांच्यासह पत्रकार शब्बीर शेख, दिलीप कुऱ्हाडे, संदीप भातकर, शाम सदाफुले आणि प्रकाश बनसोडे, गौरव तांबारे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यांनी वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांच्या कार्यकाळातील कर्तृत्ववान आणि उल्लेखनीय कामगिरीचे मनापासून कौतुक केले. त्यांच्या कडक शिस्तीसोबतच नागरिकांशी असलेली आपुलकी, सहकाऱ्यांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा यांचा विशेष उल्लेख करण्यात आला. नवीन कार्यक्षेत्रात त्यांची कारकीर्द यशस्वी, कर्तृत्ववान आणि प्रेरणादायी ठरो, अशा मनःपूर्वक शुभेच्छा उपस्थितांनी दिल्या.

सत्काराला उत्तर देताना रविंद्र कदम यांनी लक्ष्मी नगर पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी तसेच परिसरातील नागरिक आणि सर्व मान्यवरांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या कार्यकाळात मिळालेल्या सहकार्यामुळेच काम अधिक प्रभावीपणे करता आल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी लक्ष्मी नगर पोलिस ठाण्याचे नवनियुक्त वरिष्ठ पोलिस निरीक्षक युवराज नांद्रे यांनी मनोगत व्यक्त करताना, रविंद्र कदम यांनी निर्माण केलेल्या कार्यपद्धतीचा आणि चांगल्या कामाचा वारसा पुढे नेटाने व जाणीवपूर्वक नेण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

दरम्यान, लक्ष्मी नगर पोलिस ठाण्याच्या आवारातही निरोपाचा स्वतंत्र कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी झोन ४ चे पोलिस उपायुक्त रजनीकांत, एसीपी जैतापूरकर, पोलिस निरीक्षक नीलकंठ जगताप तसेच पोलिस अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तसेच सहकाऱ्यांनी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या कामाचे आणि त्यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले.

या निरोप समारंभातील सर्वात भावुक क्षण म्हणजे कदम यांना निरोप देताना अनेक अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. काही क्षणांसाठी कर्तव्याची कठोर चौकट बाजूला पडली आणि माणुसकीचे नाते पुढे आले.

अधिकारी म्हणून बदली झाली... पण माणूस म्हणून त्यांनी जिंकलेली मने मात्र लक्ष्मी नगरमध्येच राहिली.

रविंद्र कदम नवीन कार्यक्षेत्राकडे रवाना झाले असले, तरी त्यांच्या कार्याच्या आठवणी आणि त्यांनी जपलेली माणुसकीची नाती लक्ष्मी नगर परिसरातील नागरिकांच्या मनात कायमस्वरूपी घर करून राहतील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

नियमित वाचा...
सा. संघर्षाचा आवाज

अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीवर विद्यार्थी ठाम, पुण्यात रोहित पवारांचा विद्यार्थ्यांसोबत ठिय्या



पुणे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएसी) औषध निरीक्षक भरती परीक्षेत उघडकीस आलेल्या पेपरफुटीच्या प्रकारामुळे राज्यभरातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारून आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमनवार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, या मुख्य मागणीसाठी विद्यार्थ्यांनी पुण्यातील एस.एम.जोशी पुलावर गुरूवारी सायंकाळपासून बेमुदत ठिय्या आंदोलन पुकारले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या आंदोलनाला थेट पाठिंबा देत विद्यार्थ्यांसोबत रात्रभर पुलावरच ठिय्या दिला.

मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतरही लढा सुरूच

तत्पूर्वी, बुधवारी (३० सप्टेंबर) विद्यार्थ्यांच्या एका शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या मांडल्या होत्या. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सविचाची बदली आणि अध्यक्षांची न्यायालयीन चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनानंतर काही प्रतिनिधींनी २ ऑक्टोबरचे आंदोलन मागे घेत असल्याचे जाहीर केले. मात्र, गुरूवारी सायंकाळी इंदूलाल कॉम्प्लेक्स येथे जमलेल्या बहुतांश परीक्षार्थींनी ही तडजोड अमान्य करत अध्यक्षांच्या तडकाफडकी राजीनाम्याची मागणी लावून धरली. मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेतून राजीनाम्याचा कोणताही ठोस निर्णय न निघाल्याने संतप्त विद्यार्थ्यांनी आपला लढा सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला आणि थेट पुलावरच आंदोलन सुरू केले.

राजीनाम्याशिवाय माघार नाही : रोहित पवार

आंदोलक विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहताना आमदार रोहित पवार यांनी सरकारला थेट इशारा दिला आहे. एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भिमनवार यांचा राजीनामा ही विद्यार्थ्यांची प्रमुख आणि न्याय्य मागणी आहे. मात्र, राज्य सरकार या मागणीकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करत आहे. म्हणूनच आम्ही विद्यार्थ्यांसोबत एस.एम.जोशी पुलावर सत्याग्रह सुरू केला आहे. जोपर्यंत अध्यक्षांचा राजीनामा घेतला जात नाही, तोपर्यंत या सत्याग्रहातून कोणीही माघार घेणार नाही, अशी आक्रमक भूमिका रोहित पवार यांनी स्पष्ट केली.

रोहित पवार यांनी सोशल मीडिया पोस्टव्दारे पुण्यात सुरू असलेल्या एमपीएसी विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान एका पत्रकाराला कथितरित्या मारहाण आणि शिवीगाळ झाल्याचा आरोप केला आहे. संबंधित तरूण हा ABVP कार्यकर्ता असल्याचा दावा करत, त्याला आंदोलनात मुद्दाम घुसण्यात आल्याचा संशय असल्याचे पवार यांनी म्हटले आहे.

या तरूणाला तत्काळ अटक करण्याची मागणी पोलिस आयुक्तांकडे केल्याचे आणि त्याला पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे समजत असल्याचेही त्यांनी पोस्टमध्ये नमूद केले. विद्यार्थ्यांच्या आंदोलनात घुसून माध्यम प्रतिनिधींशी अशा प्रकारे गैरवर्तन करणाऱ्यांचा जाहीर निषेध करत, या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी रोहित पवार यांनी केली आहे. यावर भाजपने हे आरोप फेटाळून लावत रोहित पवारांच्या कार्यकर्त्यांवरच हुल्लडबाजीचा आरोप केला आहे.

एसआयआर : हरकतींसाठी १२ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ; बीएलओ घरी येऊन कागदपत्रे स्वीकारणार नोटीसधारक मतदारांना दिलासा; मतदार यादीत नाव नोंदणी व दुरुस्तीची पुन्हा संधी

पुणे : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती दाखल करण्यासाठी १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. 'नो मॅपिंग' किंवा तार्किक विसंगतीमुळे नोटीस प्राप्त झालेल्या मतदारांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी तहसील कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही. संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मतदारांच्या घरी भेट देऊन आवश्यक कागदपत्रे स्वीकारणार आहेत. त्यामुळे पात्र मतदारांना मतदार यादीत नाव नोंदणी, दुरुस्ती तसेच हरकती नोंदविण्याची पुन्हा संधी उपलब्ध झाली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

मतदार यादीतील नोंदीमध्ये तार्किक विसंगती आढळून नोटीस प्राप्त झालेल्या मतदारांनी सुनावणीसाठी तहसील कार्यालय, निवडणूक निर्णय अधिकारी



(ईआरओ) किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी (एईआरओ) कार्यालयात गर्दी करण्याची आवश्यकता नाही. संबंधित मतदारांनी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. बीएलओ घरी भेट देऊन कागदपत्रे स्वीकारतील. उपलब्ध सुविधेनुसार व्हॉट्सअॅप किंवा ऑनलाइन माध्यमातूनही आवश्यक कागदपत्रे सादर करता येतील. संबंधित विसंगतीच्या अनुषंगाने प्राप्त कागदपत्रे, बीएलओचा अहवाल किंवा पंचनामा याआधारे प्रकरणाची कार्यवाही करण्यात येईल. कागदपत्रे अपूर्ण असल्यास आवश्यकतेनुसार अपवादात्मक परिस्थितीत ऑनलाइन सुनावणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

३, ४, १० आणि ११ ऑक्टोबरला विशेष शिबिरे

वाढीव कालावधीत कोणताही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी ३, ४, १० आणि ११ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरांमध्ये संबंधित बीएलओ उपस्थित राहतील. प्रारूप मतदार यादीत नावाची पडताळणी, नवीन मतदार नोंदणीसाठी नमुना ६, मतदार यादीतील तपशीलात दुरुस्तीसाठी नमुना ८ तसेच नोटीस प्राप्त झालेल्या मतदारांकडून आवश्यक कागदपत्रे स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

ऑनलाइन सुविधेचाही लाभ घ्यावा

प्रारूप मतदार यादीतील आपले नाव शोधणे, नवीन मतदार नोंदणीसाठी नमुना ६ भरणे तसेच मतदार यादीतील माहितीमध्ये दुरुस्तीसाठी नमुना ८ ऑनलाइन भरता येणार आहे. यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या 'वोटर हेल्पलाइन' ॲपचा वापर करता येईल. एसआयआर कार्यक्रम, नोटीस, मतदार नोंदणी तसेच विशेष शिबिरांबाबत अधिक माहितीसाठी १९५० या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधता येईल.

महाविद्यालयांमध्ये ५ ते ९ ऑक्टोबरदरम्यान नोंदणी

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये ५ ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पात्र विद्यार्थ्यांची ऑनलाइन मतदार नोंदणी करण्यात येणार आहे. तसेच औद्योगिक आस्थापना, कंपन्या, कारखाने आणि विविध संस्थांमधील पात्र नागरिकांची मतदार नोंदणी वाढविण्यासाठी १२ ऑक्टोबरपर्यंत मतदार जागृती व विशेष नोंदणी उपक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील कोणताही पात्र मतदार मतदार यादीतून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. नोटीस प्राप्त झालेल्या मतदारांनी घाबरून तहसील कार्यालयात गर्दी न करता संबंधित बीएलओशी संपर्क साधावा. विशेष शिबिरे तसेच ऑनलाइन सुविधांचा लाभ घ्यावा आणि कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

कंत्राटी कामगारांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या वैद्यकीय हक्कांसाठी प्रशासनाने तातडीने चर्चा करून प्रलंबित प्रश्नांवर ठोस, लेखी व वेळबद्ध निर्णय घ्यावा - शरद भाकरे

पुणे : ESIC हॉस्पिटल, बिबवेवाडी येथील कामगार व त्यांच्या कुटुंबीयांच्या वैद्यकीय हक्कांसाठी बेमुदत उपोषण तसेच नोंदणीकृत ट्रेड युनियन असलेल्या कामगार हितरक्षक संघ महाराष्ट्र राज्य यांच्यावर घालण्यात आलेल्या कथित तोंडी बंदीबाबत कायदेशीर आधार व लेखी आदेश देण्याबाबत नुकतेच आक्रमक आंदोलन झाले. यावेळी निवेदनाची प्रत संबंधित अधिकाऱ्यांना देताना कामगार हितरक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष शरद भाकरे, सचिव मनिष भाई शेठ आणि सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

कामगार हितरक्षक संघ महाराष्ट्र राज्य ही अधिकृत ट्रेड युनियन, रजि. क्र. PN ५२७१ असून कामगारांच्या हक्कांसाठी तसेच ESIC अंतर्गत कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना योग्य वैद्यकीय सुविधा मिळाव्यात यासाठी संघ सातत्याने कार्यरत आहे.

ESIC हॉस्पिटल, बिबवेवाडी येथे कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना उपचार घेताना विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याने संघाच्या वतीने यापूर्वीही प्रशासनाकडे निवेदने, तक्रारी व मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. दिनांक ३१/०८/२०२६ रोजी देखील संघाच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते.

मात्र, कामगारांच्या वैद्यकीय प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणाऱ्या संघटनेच्या कार्यात अडथळा निर्माण करण्याच्या दृष्टीने कामगार हितरक्षक संघाला ESIC हॉस्पिटलमध्ये येण्यास/कामगारांच्या प्रश्नांसाठी प्रतिनिधित्व करण्यास तोंडी बंदी आहे अशा स्वरूपाचे निर्देश देण्यात आल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे या आंदोलनात त्यांनी कामगार



हितरक्षक संघ महाराष्ट्र राज्य ही नोंदणीकृत ट्रेड युनियन असताना संघावर तोंडी बंदी कोणत्या कायद्याच्या, कोणत्या कलमाच्या आणि कोणत्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या अधिकाराने घालण्यात आली आहे?

जर संघाच्या प्रवेशावर, प्रतिनिधित्वावर किंवा कामगारांच्या प्रश्नांवर संघाच्या वतीने चर्चा/निवेदन देण्यावर कोणतीही बंदी घालण्यात आली असेल, तर प्रशासनाने खालील माहिती लेखी स्वरूपात द्यावी सदर बंदी घालण्याचा कायदेशीर आधार व संबंधित कायद्याचे नाव, लागू केलेले विशिष्ट कलम/नियम, बंदीचा आदेश देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याचे नाव व पद, सदर आदेशाची प्रत, आदेशाची दिनांक व क्रमांक, बंदी कोणत्या कालावधीसाठी आहे याची माहिती, सदर बंदी कोणत्या कारणास्तव घालण्यात आली याचे स्पष्ट लेखी कारण, फक्त तोंडी सूचना देऊन नोंदणीकृत ट्रेड युनियनच्या वैधानिक कामकाजावर निर्बंध घालणे योग्य आहे का, याबाबत प्रशासनाने स्पष्ट कायदेशीर भूमिका लेखी स्वरूपात द्यावी.

Trade Unions Act, १९२६ हा नोंदणीकृत ट्रेड युनियनशी संबंधित नोंदणी व अधिकारांची कायदेशीर चौकट देतो. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात कामगार संघटनांच्या मान्यता व अनुचित कामगार प्रथांबाबत MRTU PULP Act, १९७१ लागू आहे.

त्यामुळे तोंडी बंदी असल्यास तिचा कायदेशीर आधार काय आहे, हे प्रशासनाने स्पष्ट करणे आवश्यक आहे. असे म्हणून त्यांनी प्रमुख तक्रारी मांडल्या यामध्ये कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना आवश्यक वैद्यकीय उपचार मिळताना येणाऱ्या अडचणी, गंभीर रुग्णांना आवश्यक तज्ज्ञ उपचार मिळण्यास होणारा विलंब, ESIC कार्डमध्ये कुटुंबीयांची नावे समाविष्ट/अद्ययावत करण्यास येणाऱ्या अडचणी, पात्र रुग्णांना ESIC अंतर्गत उपचार मिळण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सुविधा मिळण्यात येणाऱ्या अडचणी, रुग्णांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण न होण्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, आवश्यक वैद्यकीय सुविधा व तज्ज्ञ डॉक्टर उपलब्धतेबाबत कामगारांकडून उपस्थित करण्यात आलेले प्रश्न, कामगारांच्या वैद्यकीय प्रश्नांबाबत संघाच्या प्रतिनिधींशी योग्य पद्धतीने चर्चा न होणे. तसेच संघटनेच्या वतीने प्रमुख मागण्या करण्यात आल्या. यामध्ये प्रत्येक पात्र कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना वेळेवर व योग्य ESIC वैद्यकीय सुविधा द्याव्यात, ESIC कार्ड व कुटुंबीयांच्या नोंदी अद्ययावत करण्यासाठी प्रभावी व्यवस्था करावी, गंभीर रुग्णांना आवश्यक तज्ज्ञ डॉक्टर व उपचार तातडीने उपलब्ध करून द्यावेत, रुग्णांच्या तक्रारींसाठी प्रभावी तक्रार निवारण व्यवस्था सुरू करावी, यापूर्वी संघाने दिलेल्या निवेदनांवर केलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल द्यावा, कामगारांच्या वैद्यकीय प्रश्नांवर संघाच्या प्रतिनिधींसोबत अधिकृत बैठक घ्यावी, कामगार हितरक्षक संघावर कोणतीही बंदी/निर्बंध असल्यास त्याचा कायदेशीर आदेश तातडीने लेखी स्वरूपात द्यावा.

अशी कोणतीही कायदेशीर तरतूद किंवा सक्षम आदेश नसल्यास तोंडी बंदी तात्काळ मागे घेण्यात यावी आणि संघाला कामगारांच्या वैद्यकीय प्रश्नांसाठी कायदेशीर व शांततामय पद्धतीने प्रतिनिधित्व करण्यास परवानगी द्यावी. संघाच्या प्रतिनिधींना कामगारांच्या वैद्यकीय प्रश्नांबाबत प्रशासनाशी चर्चा व निवेदन करण्यासाठी अधिकृत प्रक्रिया निश्चित करावी.

सारा महाराष्ट्र बौध्दमय केल्याशिवाय मरणार नाही - प्रबुध्द साठे



परभणी : येथील नालंदानगर बुध्दविहार प्रसंगी भारत बुध्दांचा देश आहे, बौध्द भारताचे पुननिर्माण करणे हेच खरे राष्ट्रीय कार्य आहे. यासाठी चला आपल्या बुध्दाच्या घरी अभियान चालवित असून सारा महाराष्ट्र बौध्दमय केल्याशिवाय मरणार नाही. असे रोखठोक प्रतिपादन चला आपल्या बुध्दाच्या घरी अभियान प्रमुख प्रबुध्द साठे यांनी केले. ते लॉर्ड बुध्दा टिव्ही आयोजित धम्म संकल्प अभियान-२०२६ या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष भदंत डॉ.उपगुप्त महाथेरो, भदंत सुगत शांतेय थेरो, श्रीलंकेतील आर्या महाराजगामा उप्पलवन्न थेरी, आर्या धम्मदीपा सिल्माथावा, म्यानमारचे आर्याजी सयाले साध्याग्यानी, आर्याजी सयाले रूपावती, आर्याजी सयाले कुसलाचारी, सामाजिक कार्यकर्ते विशाल इंगळे उपस्थित होते.

प्रबुध्द साठे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, राजकीय लोकशाहीचे सामाजिक व आर्थिक लोकशाहीमध्ये रूपांतर करणे ही महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित धम्मक्रांती होय. माणूस म्हणून स्तत:ला स्वीकारणे म्हणजे बौध्द होणे माणूस आणि माणसाचे कल्याण हे बुध्दधम्माचे प्रयोजन आहे. आरक्षण ही बहुजनांची समस्या नसून ते स्वत:ला हिंदू म्हणून घेतात ही त्यांची सगळ्यात मोठी समस्या असून त्यांनी बुध्दधम्माचा स्वीकार करून घर वापसी करणे हाच त्यावरील उपाय आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लॉर्ड बुध्दा टिव्हीचे सचिन मून आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्याससाठी परभणी येथील नालंदा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष करण गायकवाड, भीमप्रकाश गायकवाड, धम्मज्योती महिला मंडळ अध्यक्ष कौशल्या आव्हाड, भीमजयंती समिती अध्यक्ष विशाल शिंदे यांनी प्रयत्न केले.